माहितीचा
अधिकार

**महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये**
**प्राप्त झालेली तक्रार**

**तक्रार क्रमांक : ४८३/२०१९**

**तक्रारकर्ता, श्री. प्रफुल श्रीकृष्ण व्यास,**

**--विरुध्द--**

**जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ प्रशासन अधिकारी,**
**शिक्षण विभाग, पंचायत समिती कुही, ता. कुही जि. नागपूर**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,**
**शिक्षण विभाग पंचायत समिती कुही, ता. कुही जि. नागपूर**

**तक्रार अर्जावरील सुनावणी दिनांक : १७.०५.२०२३**

**तक्रारकर्ता** : उपस्थित
**जन माहिती अधिकारी** : उपस्थित
**प्रथम अपीलीय अधिकारी** : उपस्थित

| द्वितीय अपील आदेशाचा दिनांक | आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा दिनांक | मूळ तक्रार अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक |
|---|---|---|
| ०३.०४.२०१९ | --- | ०३.०९.२०१९ |

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) नुसार द्वितीय अपील क्र. ३७९६/२०१८ दिनांक ०३.०४.२०१९ रोजी पारीत केलेल्या आदेशानुसार कार्यवाही न झाल्यामुळे आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे. सदर तक्रारीवर दिनांक १७.०५.२०२३ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. आज रोजी सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता उपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ प्रशासन अधिकारी, शिक्षण विभाग, पंचायत समिती कुही, जि. नागपूर, श्रीमती प्रमिला अनिल वाकडे उपस्थित आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रशासकिय गट विकास अधिकारी, शिक्षण विभाग, पंचायत समिती कुही, जि. नागपूर, श्रीमती शारदा किनारकर उपस्थित आहेत.

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर विभाग * नागपूर *

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगात दाखल केलेल्या द्वितीय अपील क्र. ३७९६/२०१८ मध्ये दिनांक ०३.०४.२०१९ रोजी सुनावणी घेवून " सदर प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसात अपिलार्थीस कार्यवाहीबाबत अद्ययावत माहिती कागदपत्रांच्या प्रतीसह विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी व त्याची पोहच आयोगास सादर करावी, " असे आदेशीत करुन प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात आले आहे.

सदर द्वितीय अपीलावरील आदेशास अनुसरुन तक्रारकर्ता यांनी दिनांक ०३.०९.२०१९ रोजी कलम १८(१) अन्वये तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर आज रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. अपिलार्थी यांनी व्दितीय अपिल क्र. ३७९६/२०१८ मध्ये दिनांक ०३.०४.२०१९ रोजी पारित केलेल्या आदेशाची अमंलबजावणी न केल्यामुळे तक्रार अर्ज दाखल केला. तत्कालिन जनमाहिती अधिकारी तथा कनिष्ठ प्रशासन अधिकारी, शिक्षण विभाग, पंचायत समिती कुही, जि. नागपूर हे वैद्यकीय कारणास्तव रजेवर असल्यामुळे आयोगाने पारित केलेल्या आदेशाचे पालन करण्यास विलंब झाला असल्याचे सुनावणी दरम्यान सांगण्यात आले. आयोगाने पारित केलेल्या आदेशानुसार अनुपालन अहवाल सादर करण्यात आला आहे. अपिलार्थी यांना माहिती प्राप्त करून घेण्यास स्वारस्य नसल्याचे त्यांनी प्राज्वंलपणे कबूल करून कुठल्याही दबाबवाखाली न येता प्रकरण नस्तीबध्द करण्याबाबत विनंती केली आहे. सबब, अपिलार्थी यांच्या विनंतीनुसार प्रकरण अंतीमत: नस्तीबध्द करण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर
नागपूर
सत्यमेव जयते

**(राहुल भा. पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण :** नागपूर
**दिनांक :** १७.०५.२०२३

जा.क्र.-8E20-दि.------------
3 AUG 2023